सं.फौ.ख.क्र.१८२ /२०२४
सरकार / सत्यप्रकाश
नि.क्र. १०

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी,**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : योगेश मोतीराम मुनेश्वर ब.न. १४९६
वय : ४२ वर्षे, कामधंदा : पोलीस हवालदार
राहणार : पोलीस स्टेशन आमगांव, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही. [आरोपीला न्यायालयात हजर असुन मागे आरोपीच्या बाकावर बसलेला आहे. परंतु साक्षदारांने त्याला ओळखले नाही.] दिनांक २८/०८/२०२४ रोजी रात्री ११:३० च्या सुमारास आमगांव विभागामध्ये आम्ही सरकारी वाहनाने गस्त करीत होतो. मी ते वाहन चालवत होतो. त्यावेळी माझ्या सोबत पोलीस उपनिरीक्षक शहारे व पोलीस शिपाई पटले असे होते. आमचा गाडीचा क्रमांक एमएच ३५ एडब्लू ०४६४ असा होता. त्यानंतर त्या गाडी मध्ये तांत्रीक बिघाड आल्याने ती गाडी पोलीस ठाण्यात आणून दुसरे वाहन क्रमांक एमएच ३५ डी ०५६५ या गाडी किंडगीपार मार्गे रेल्वे गेट पार करुन गोरठा कडे गेलो. तेथे पुलाचे बांधकाम सुरु होते व रस्ता खराब असल्याने मी गाडी हळू चालवित होतो. त्यावेळी गोंदिया वरुन एक भरगाव वेगात चारचाकी गाडी मॅगना आय-१० एमएच ३५ एएजी ६३९९ ही आली. त्या गाडीच्या चालकाने आमच्या गाडीला समोरुन जोराची धडक दिली. आम्ही आमच्या गाडीतून बाहेर पडलो. आम्हाला किरकोळ दुखापत झाली होती. समोरुन धडक दिलेल्या चारचाकी वाहनाचा दरवाजा उघडून कोण बसलेला आहे हे पाहिले. गाडीमध्ये तिन इसम बसलेले दिसून आले. त्या गाडीचा चालक काहीच हालचाल करीत नव्हता. मागे बसलेल्या दोन इसमांना त्यांचे नाव विचारुन त्या तिघांना गाडी बाहेर काढले व रुग्णवाहिकेला बोलवून त्या इसमांना उपचाराला करीता ग्रामीण रुग्णालय आमगांव येथे नेले. त्यावेळी मागील सिट वर बसलेल्या इसमांनी त्यांचे नावे तिसूजा व कमलेश चव्हाण असे सांगितले. गाडी चालकाचे नाव विचारले असता त्याचे नाव सत्यप्रकाश पटले असे असल्याचे सांगितले. आम्ही देखील रुग्णालयात उपचार घेतले. मी त्यानंतर पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखविली. त्यावर माझी स्वाक्षरी आहे ती मी ओळखतो. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ११** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री एन. वाय. शेख यांचे मार्फत सूरु-**

२. मी सन २०२१ पासून पोलीस गाडी चालक म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर रस्त्याचे काम सुरु असल्याने एकाच बाजूने वाहनांची ये–जा सुरु होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी गाडी हळू हळू चालविणे गरजेचे होते. हे

म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या ठिकाणी त्यावेळी खड्डे पडलेले होते. ज्या गाडीने धडक ती गाडी कोणती होती व त्याचा क्रमांक काय होता हे पाहिलेले होते. त्याचा गाडीचा रंग देखील मला माहिती आहे. प्रस्तुत कामी जी गाडी जप्त झाली त्याच गाडीने आम्हाला धडक दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेली गाडी आरोपीची नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी बऱ्याच गाडया रस्त्यावरुन ये–जा करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, रात्र असल्याने तेथे अंधार होता. साक्षदार स्वतःहून सांगतो की, लाईटची खांब तेथे होते. हे म्हणणे खरे नाही की, कोण गाडी चालवित होते हे मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला गाडी चालवितांना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला केस मध्ये अडकविण्याकरीता फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतेही घटना घटलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये माझी चुक होती. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताची आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला त्यावेळी मार लागला असल्याने गाडी कोण चालवित होता हे मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांक : २१/०८/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव**